# पुष्परचना

**योग्य प्रकारची पाने फुले वापरून पुष्पपात्रात त्यांची कलात्मक सुसंबद्ध रचना करणे म्हणजेच पुष्परचना होय. पुष्परचनेमुळे जेवणाच्या खोलीची, बैठकीच्या खोलीची शोभा वाढते व प्रसन्नता वाढते.**

**पुष्परचनेसाठी आवश्यक असलेलं साहित्य**

• फुलदाणी ( Flowerpot) • पिन होल्डर किंवा विविध आकाराच्या फोम ब्रिक्स • स्वच्छ पाणी • कात्री • पाने, फुले

**फुलदाणी** फुलदाणीची निवड करतांना रंग फिकट उदा. मोतिया, पांढरा, दगडी अथवा हिरवा असावा. फुलदाणी फार भडक, नक्षीदार असल्यास सुंदर पुष्परचनेपेक्षा फुलदाणीच लक्ष वेधून घेईल.

**पाणी** पुष्परचनेसाठी दुसरी आवश्यक गोष्ट म्हणजे स्वच्छ पाणी. पाणी म्हणजेच फुलांचे जीवन. पुष्परचना करतांना थोडे पाणी घालावे म्हणजे पाणी खाली सांडत नाही व फुले खराब होत नाहीत. पुष्परचना पूर्ण झाल्यावर योग्य जागी ठेवल्यावर भरपूर पाणी घालावे. उन्हाळ्यात बर्फाचे दोन तुकडे टाकावेत.

**पिन होल्डर** फुलदाणी अरुंद तोंडाची असल्यास पिन होल्डरची आवश्यकता नसते. पण फुलदाणी पसरट असल्यास पाने फुले हव्या त्या आकारात बसविण्यासाठी पिन होल्डरची किंवा फोम ब्रिक्सची आवश्यकता असते. पिन होल्डर विकत घेतांना जाड, मोठा व जवळ जवळ काटे असलेला घ्यावा . लहान घेतला तर पुष्परचना करतांना पाने, फुले, फांद्या वारंवार खाली पडून पुष्परचना करायला त्रास होतो व पाने, फुले खराब होतात. आता पिन होल्डरपेक्षा फोमी ब्रिक्सचा वापर वाढला आहे.

**कात्री** पाने, फुले कापायला लागणारी कात्री धारदार असावी.

## पाने, फुले व इतर साहित्य

- पुष्परचनेसाठी लागणारे साहित्य म्हणजे पाने, फुले, कणसे, तुरे इ. हे सगळे २ ते ३ दिवस टिकणारे असायला हवे.
- झाडावरची फुले तोडायची असल्यास सकाळी लवकर किंवा ऊन उतरल्यावर तोडावीत. तोडल्याबरोबर थोड्या थंड पाण्यात ठेवावीत. नंतर घरात आणून भरपूर पाण्यात देठे बुडवून थंड जागी ६ ते ८ तास ठवल्यावर त्यांचा उपयोग करावा.
- पुष्परचना कशी करावयाची हे ठरवून त्याप्रमाणे फुले तोडावीत व लागणार असतील त्यापेक्षा २-३ फुले जास्त तोडावीत.
- गुलाबाची फुले वापरतांना अर्धवट उमललेल्या कळ्याच वापराव्यात.
- ज्या फांद्यांच्या देठातून चीक निघतो त्या फांद्या किंवा देठ कोळश्यावर घासाव्यात अथवा देठाचा भाग मेणबत्तेवर धरून जाळावा म्हणजे चीक निघणे थांबते.
- गुलाबाचे फूल कागदात गुंडाळून कापलेला दांडा उकळत्या पाण्यात बुडवावा आणि लगेच काढून बर्फाच्या पाण्यात बुडवावा. या शॉक ट्रीटमेंटने गुलाबाची फुले जास्त दिवस टिकतात

